CNRMHSN150000672020

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०३. | ०९. | २०१८ |
| नोंदणी तारीख | : | ०६. | ०९. | २०१८ |
| निकाल तारीख | : | ०२. | ०५. | २०२५ |
| कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | ०६ | ०७ | २९ |

**विटा येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
(**पीठासीन अधिकारी श्री.आय.आर.शेख**)

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३४/२०२०**
**(जुना कि.दि.अ.क्र. १७३/२०१८)**
**निशाणी क्र. ११२**

१. सौ. रत्नप्रभा मल्लकार्जुन घेवारी
वय– ७९ वर्षे, व्यवसाय – घरकाम
रा. स्फुर्ती चौक, विश्रामबाग, सांगली

२. शिवबाई महादेव मिणचे– मयत वारस
२.१ प्रकाश ऊर्फ शशिकांत महादेव मिणचे
वय– ७० वर्षे, व्यवसाय– शेती / व्यापार
रा. मु.पो. इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

३. महादेवी मुरग्याप्पा सबरद
वय– ७५ वर्षे, व्यवसाय– घरकाम
रा. द्वारा सौ. रत्नप्रभा मल्लीकार्जुन घेवारी
रा. स्फुर्ती चौक, विश्रामबाग, सांगली **..अर्जदार**

**विरुद्ध**

१. श्री. संदिप कमलाकर महाजन
वय– ३८ वर्षे, व्यवसाय – नोकरी

२. श्री. राहूल कमलाकर महाजन
वय– ३६ वर्षे, व्यवसाय– नोकरी

३. श्री. महेश कमलाकर महाजन
वय– ३४ वर्षे, व्यवसाय – नोकरी

४. श्रीमती मायादेवी कमलाकर महाजन
वय– ५८ वर्षे, व्यवसाय – घरकाम
सर्व रा. मु.पो. पलूस, ता. पलूस, जि. सांगली

५. शांताबाई गुरुलिंगाप्पा सबरद (मयत वारस)
५.१ कै. सुरेश गुरुलिंगाप्पा सबरद (मयत वारस)
५.१.१ पुजा सुरेश सबरद
वय– २० वर्षे, व्यवसाय – शिक्षण

५.१.२ सुनंदा सुरेश सबरद
वय– ४० वर्षे, व्यवसाय – घरकाम
दोघी रा. मिरज, ता. मिरज, जि. सांगली

६. श्रीमती शकु महालिंग पिसे
वय – ६५ वर्षे, व्यवसाय – घरकाम
रा. मु.पो.दानोळी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

७. श्रीमती शशिकला कृष्णा तांदुळवाडकर
वय – ४५ वर्षे, व्यवसाय – घरकाम
रा. शेणोली, ता. वाळवा, जि. सांगली .... **जाबदार**

---

**अर्ज – भारतीय रेग्युलेशन एक्ट कलम ८ अन्वये वारसा दाखला मिळणेबाबत**

---

**अर्जदार तर्फे विधीज्ञ – श्री. एन.बी.कोळेकर**
**जाबदार तर्फे विधीज्ञ – श्री. एम.बी.पाटील**


---

**न्यायनिर्णय**
**(दि. ०२/०५/२०२५ रोजी घोषित )**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन एक्ट कलम ८ अन्वये अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर होवून त्यांचे नावे वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, जिल्हा तुकडी सांगली व पोट तुकडी पलूस पैकी मौजे पलूस येथील शेत मिळकत गट नं. ८३० क्षेत्र हे.२– २० आर व गट नं. १९६२ क्षेत्र हे. २ – ६३ आर या मिळकती अर्जदार यांचे वडिलार्जित मिळकती असून त्यामधील कै. दत्तोबा हरी महाजन यांच्या हिश्यास आलेल्या मिळकतीचे वारस जाहीर होवून मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्जदार पुढे असे कथन करतात की, अर्जदार यांचे जनक वडील कै. दत्तोबा (दत्तू) हरी महाजन यांचे कायदेशीर वारस खाली दिलेल्या वंशावळीप्रमाणे आहेत.




४. अर्जदार असे कथन करतात की, कै. दत्तोबा हरी महाजन यांना अर्जदार व जाबदार यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार क्र. १,२ व ३ आणि जाबदार क्र. ५ हे कै. दत्तोबा हरी महाजन व त्यांची प्रथम पत्नी कृष्णाबाई दत्तोबा महाजन यांच्या मुली आहेत. जाबदार क्र. १ ते ४, ६ व ७ ही कै. दत्तोबा हरी महाजन व त्यांची द्वितीय पत्नी लक्ष्मीबाई दत्तोबा महाजन यांची मुले आहेत. जाबदार क्र. ५ यांनी पलूस येथील मा. तहसीलदार यांचे कोर्टात वारस रजिस्टर / २००४ अन्वये अर्ज केला होता, त्यामध्ये कोणतेही आदेश न झाल्याने अर्जदार यांनी जाबदार क्र. ५ यांचे पश्चात चौकशी केली असता अर्जदार यांना त्याकामी वारस गृहित धरले नसल्याचे समजले. सबब, अर्जदार यांनी ते कै.

दत्तोबा हरी महाजन यांचे कायदेशीर वारस असून त्यांच्या पश्चात अर्जदार यांची नावे कायदेशीर वारस म्हणून न लागल्यामुळे व मा. तहसीलदार पलूस यांचे न्यायालयातील अर्जावर कोणतेही आदेश न झाल्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. जाबदार क्र. २ यांनी निशाणी २७ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे. त्यांचे असे कथन आहे की, गट नं. ८३० व १९६२ या मिळकती जाबदार यांच्या मालकी हक्क कब्जेवहिवाटीच्या असून त्यास अर्जदार यांची नावे वारस म्हणून लागू शकत नाहीत. मयत कृष्णाबाई ही मौजे पलूस येथे अन्य गावाहून तिच्या नव–याने सोडल्यामुळे तिच्या मुलींसह आलेली अबला स्त्री होती. मयत कृष्णाबाई ही दत्तोबा महाजन यांचे समाजातील असल्यामुळे त्यांनी व त्यांचे कुटुंबियांनी तिला व तिच्या मुलींना आसरा दिलेला होता. कृष्णाबाई हिच्या मृत्यूनंतर तिचे मुलींना कै. दत्तोबा महाजन व त्यांचे कुटुंबियांनी वेळोवेळी मदत केलेली आहे. कै. दत्तोबा महाजन यांचा कृष्णाबाई हिचेशी कधीही विवाह झालेला नव्हता. अर्जदार यांचा जाबदार यांचेशी कोणताही हक्कहितसंबंध नसल्याने तसा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदार यांनी सादर केला नसल्यामुळे मे.तहसीलदारसाो, पलूस यांनी अर्जदार यांना वारस म्हणून गृहित धरले नसल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुतचे अर्जास मुदतीच्या कायद्याची बाधा येते. अर्जदार यांचे अर्जास Estoppel, Acquiescence व Waiver या तत्वाची बाधा येते. सबब, अर्ज खर्चासह फेटाळणेची विनंती केली आहे.

६. जाबदार क्र. १, ३ व ४ यांनी अनुक्रमे निशाणी क्र. ३८,४४,४५ वर जाबदार क्र. २ यांचे म्हणणे स्वीकारत असल्याबाबतची पुरसीस दाखल केली आहे.

७. जाबदार क्र. १ ते ३ यांनी निशाणी १०४ वर अर्जदार यांच्या दुरुस्त अर्जास म्हणणे देवून विरोध केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जदार यांनी मूळ अर्जातील कलम ३ मधील वंशावळीत दुरुस्ती करुन मयत कृष्णाबाई हिला दत्तोबा हरी महाजन यांची प्रथम पत्नी व मयत लक्ष्मीबाई हिला कै. दत्तोबा हरी महाजन यांची द्वितीय पत्नी असा मजकूर नमूद करुन दुरुस्ती केलेली आहे. मुळात मयत कृष्णाबाई हिचा कै. दत्तोबा यांचेबरोबर कधीही विवाह झालेला नव्हता. त्यामुळे अर्जदार हे दत्तोबा यांचे वारस होवू शकत नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा.

८. माझे पुर्वाधिकारी यांनी निशाणी ४८ वर इंग्रजीमध्ये मुद्दे काढलेले आहेत. त्यांचा मराठी अनुवाद मी खालीलप्रमाणे करीत असून त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे –

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे कै. दत्तोबा हरी महाजन यांचे कायदेशीर वारस आहेत, असे अर्जदार सिध्द करतात काय ? | **नाही.** |
| २. | अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे वारसाप्रमाणपत्र मिळणेस ते पात्र आहेत काय ? | **नाही.** |
| 3. | काय आदेश व हुकूमनामा ? | **अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येतो.** |

<u>का र ण मि मां सा</u>

<u>मुद्दे क्र. १ व २ च्या अनुषंगाने</u> –

९. अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदार यांनी सौ. रत्नप्रभा (अ.सा.क्र.१) यांना निशाणी ६७ वर, सौ. महादेवी (अ.सा.क्र.२) यांना निशाणी ६८ व १०६ वर तपासलेले आहे.

१०. अर्जदार यांनी निशाणी ३९ वर दि. ११.१२.२०१९ रोजीच्या दै. तरुण भारत वर्तमानपत्रातील जाहीर नोटीस, निशाणी ६९ वर गट नं. ८३० चा सातबारा उतारा, निशाणी ७० वर गट नं. १९६२ चा सातबारा उतारा, निशाणी ७१ वर जुना सर्वे नं. ९६ चा उतारा, निशाणी ७२ वर मृत्यूरजिस्टरचा उतारा, निशाणी ८८ वर अर्जदार क्र. १ चा शाळा सोडल्याचा दाखला, निशाणी ८९ ला अर्जदार क्र. ३ यांचा शाळा सोडल्याचा दाखला, निशाणी ९० ला अर्जदार क्र. २ चा शाळा सोडल्याचा दाखला, निशाणी ९१ वर दि. ०८.१२.२०१८ रोजीच्या दै. तरुण भारत वर्तमानपत्रातील जाहीर नोटीस, इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

११. जाबदाराच्या वकीलांनी असे युक्तीवाद केला की, अर्जदार यांनी अर्जामध्ये मयत दत्तोबा महाजन यांची पहिली पत्नी कोण आहे, दुसरी पत्नी कोण आहे हे नमूद केलेले नाही. अर्जदार यांनी कथित रित्या पलूस येथील तहसीलदार यांचे कार्यालयात वारसा प्रमाणपत्रासाठी कोणती कारवाई केली याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदारांनी मोघमपणे सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी सदर अर्जामध्ये आवश्यक पक्षकारांना समाविष्ट केलेले नाही. सदर अर्ज उशिरा आलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

१२. श्री. राहूल (जा.सा.क्र.१) यांना निशाणी ८२ वर तपासलेले आहे. त्याने उलटतपासात सांगितले की, जाबदार क्र. १ यांना दोन भाऊ व एक बहिण आहे. जाबदार यांनी निशाणी १०२ ला मूळ रेशनकार्ड दाखल केलेले आहे. सदर बहिणीचे नाव गितांजली कमलाकर महाजन आहे. एकंदरीत जाबदार क्र. १ ला दोन भाऊ व एक बहिण आहे. मात्र बहिण गितांजलीला या दाव्यात पक्षकार केलेले नाही.

१३. या ठिकाणी नमुद करणेसारखे आहे की, अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी पलूस येथील मा. तहसीलदार यांचे कोर्टात वारसा दाखला मिळणेचा अर्ज केला होता. मात्र सदर अर्ज, अर्जाचा नंबर, तो कधी दाखल केला होता, त्याप्रकरणात काय आदेश झाले होते किंवा ते कशामुळे प्रलंबित आहे याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे यासंदर्भात अर्जदाराच्या केवळ तोंडी पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही.

१४. जाबदाराच्या वकिलांनी पुढे असा युक्तीवाद केला की, अर्जदारांनी सदरचा अर्ज अत्यंत मोघमपणे दाखल केला आहे. दत्तोबा हरी महाजन यांची पहिली पत्नी कोण, दुसरी पत्नी कोण याबाबत अर्जामध्ये कथन केलेले नाही. कथितरित्या दत्तोबा महाजन व कृष्णाबाई यांना मुली झाल्या, त्याबाबत तारखा नमूद केलेल्या नाहीत. यासंदर्भात अर्जामध्ये सविस्तर असे कथन केलेले नाही. त्यामुळे अर्जदारची मागणी सदर अर्जामध्ये संक्षिप्तरित्या मंजूर करता येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज सध्यस्थितीत समर्थनीय नाही. या संदर्भात त्यांनी त्यांचा भरवसा खालील प्रावहनावर ठेवला आहे.

***Shobhabai W/o Prakash Telure V.s. The State of Maharashtra on 04th October 2011,*** *Hon'ble Bombay High Court held that,*

*" From careful perusal of the pleadings by the parties, documents placed on record and evidence scanned by the appellate Court, it will have to be concluded that, neither Shobhabi nor Mandanbai have place sufficient evidence on record or proved documents which would lead to only inference that their marriage with Prakash is legal one. In the given case, it may be also necessary to find out whose marriage is first in time with Prakash. Therefore, unless appropriate evidence is led by the parties and documents are proved, in the facts and circumstances of this case, it is not possible to accept the claim of either Shobhabi or Mandanbai. In that view of the matter, in my considered opinion, the findings recorded by the appellate Court are in consonance with the evidence brought on record.*

*24. It is true that, when application is made for heir certificate, in the first instance the concerned Court has to exercise powers in a summary*

*manner and in a case where there no erious dispute, such procedure adopted by the Court and issuance of certificate may be acceptable. However, in facts and circumstances of this case, whenboth the parties are seriously canvasing their claim, in that case, unless the competent civil Court records the findings after appreciation of evidence and after giving opportunity to the parties to prove the documents, it is not possible to accept the 38 cra 134.11 claim of either of the parties. In that view of the matter, in the facts of this case it will have to be held that, the appellate Court did reach to the correct cnclusion. It is also not out of place to mention, that merely placing on record the marriage invitation card or certificate issued by Grampanchayat or any otehr document without proving the said, same is is not sufficient to prove the claim. It is necessary that such documents are required to be proved. In the facts of this case, Shobhabai and Mandanbai have placed number of documents on record and without proving such documents, it is not possible to record definite conclusion by adopting summary procedure."*

***Baban Ramchandra Shukla & Ors., V.s. Parag Arvind Shukla & Anr. In Civil Revision Appl. No. 91 of 2016, 2018(3) ALL MR 46,*** *Hon'ble Bombay High Court held that,*

*" 15. Thus, the essential aspects, which the Court has to bear in mind while determining the application for heirship certificate is whether the person/s claiming the legal heirship certificate is/are the heirs of the deceased. Another aspect, which is also required to be considered is that the grant of heirship certificate does not create any title to the property, as such title can be stablished only in appropriate proceeding. AS a corollary thereto it follows that just as the grant of heirship certificate cannot be subject of challenge in the appeal or revision, similarly the refusal of such certificate also cannot be subject matter of the appeal or the revision. As a matter of fact, on the basis of Rule 8 of the Bombay Regularion Act, that refusal of certificate by the Judge shall not finally determine the rights of the person whose application is refused, but it shall still be competent to him to institute a suit for the purpose of establishing his claim, it was held in the above said decision of the Division Bench of this Court in the case of Aloysius Manuel Dsouza & Ors. v.s. Mary Kamala William Manuel Dsouza & Ors., that if the remedy of establishing the title to the property is necessarily available by filing a suit in case of refusal, that remedy is available even when the certificate is granted and accordingly, the appeal against grant of heirship certificate was dismissed."*

१५. या ठिकाणी नमुद करण्यासारखे आहे की, सदर अर्जामध्ये सुद्धा अर्जदार यांनी अर्जातील परिच्छेद क्र. १ मध्ये असे नमूद केले आहे की, अर्जदार व जाबदार सांगली, कोल्हापूर व कर्नाटक येथील रहिवासी आहेत. अर्जदार व जाबदार यांना शेत मिळकत व जंगम मिळकत पलूस येथे आहे. आजपर्यंत अर्जदार यांचे कायदेशीर वारस म्हणून नोंद झालेली नाही. त्यामुळे कायदेशीर वारसा दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. अर्जदारांनी परिच्छेद क्र. २ मध्ये शेतजमीनीचे वर्णन दिलेले आहे. परिच्छेद क्र. ३ मध्ये वंशावळ दिलेली आहे. अर्जामध्ये कुठेही स्पष्टपणे कथन केलेले नाही की कथितरित्या दत्तोबा महाजन व कृष्णाबाई महाजन यांचे लग्न कोणत्या वर्षी झालेले आहे. अर्जदार यांनी अर्जामध्ये कुठेही कथन केलेले नाही की, दत्तोबा महाजन व कृष्णाबाई यांना कथितरित्या मुली झाल्या, त्याच्या तारखा नमूद केलेल्या नाहीत. यासंदर्भात अर्जदारच्या विधीज्ञांनी माझे लक्ष अर्जदार क्र. १ ते ३ यांचा शाळा सोडलेचा दाखला (अनुक्रमे निशाणी क्र. ८८,८९,९०) इ. कडे वेधले. सदर कागदोपत्री पुरावा अर्जदारांनी पुरावा संपल्यानंतर युक्तीवादावेळी दाखल केलेली आहेत. जरी वरील कागदोपत्री पुरावा हा पब्लिक डॉक्युमेंट असला तरी सदर दाखल्यानुसार अर्जदारांचे नाव कोणी नोंदविले याबाबत पुरावा आलेला नाही. सदर कागदोपत्री पुरावा जिल्हापरिषद मुलींची शाळा, पलूस नं. २ ता. पलूस, जि. सांगली यांच्या मूळ रजिस्टरनुसार बरोबर आहे, याची पडताळणी झालेली नाही. याठिकाणी मी खालील प्रावाहनावर भरवसा ठेवत आहे.

***Madan Mohan Singh & Ors. Vs. Rajni Kant & Anr on 13th August 2010,AIR 2010 SC 2933,*** माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेले महत्वाचे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे मांडत आहे.

*16. So far as the entries made in the official record by an official or person authorised in performance of official duties are concerned, they may be admissible under Section 35 of the Evidence Act but the court has a right to examine their probative value. The authenticity of the entries would depend on whose information such entries stood recorded and what was his source of information. The entry in School Register/School Leaving Certificate require to be proved in accordance with law and the standard of proof required in such cases remained the same as in any other civil or criminal cases.*

*17. For determining the age of a person, the best evidence is of his/her parents, if it is supported by un-impeachable documents. In case the date of birth depicted in the school register/certificate stands belied by the un-impeachcable evidence of reliable persons andontemporaneous documents like the date of birth register of the Municipal Corporation, Government Hospital/Nursing Home etc, the entry in the school register is to be discarded. (Vide: Brij Mohan Singh Vs. Priya Brat Narain Sinha & Ors. AIR 1965 SC 282; Birad Mal Singhvi Vs. Anand Purohit AIR 1988 SC 1796; Vishnu Vs. State of Maharashtra (2006) 1*

*SCC 283; and Satpal Singh Vs. State of Haryana JT 2010 (7) SC 500).*

*18. If a person wants to rely on a particular date of birth and wants to press a document in service, he has to prove its authenticity in terms of Section 32(5) or Sections 50, 51, 59, 60 & 61 etc.of the Evidence Act by examining the person having special means of knowledge, authenticity of date, time etc. mentioned therein. (Vide: Updesh Kumar & Ors. Vs. Prithvi Singh & Ors., (2001) 2 SCC 524; and State of Punjab Vs. Mohinder Singh, AIR 2005 SC 1868).*

१६. त्यामुळे केवळ वरील कागदोपत्री पुराव्याला निशाणी क्रमांक दिले म्हणून दत्तोबा हरी महाजन व कृष्णाबाई यांच्या अर्जदार क्र. १ ते ३ या मुली आहेत, असा निष्कर्ष काढता येत नाही. सदर बाब अर्जदारला पहिले अर्जामध्ये कथन करावी लागते मग त्यानंतर त्यावर सबळ पुरावा द्यावा लागतो.

१७. जाबदारच्या विधीज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की, दत्तोबा हरी महाजन यांचा मृत्यू १९५२ साली झालेला आहे. याबाबत निशाणी ७१ व ७२ वर मृत्यूरजिस्टरचा उतारा दाखल केलेला आहे. त्यानुसार मयत दत्तोबा हरी महाजन यांचा मृत्यू दि. ०६.१२.१९५२ रोजी झाल्याचे नमूद आहे. जाबदारच्या विधीज्ञांनी पुढे युक्तीवाद केला की, अर्जदार क्र. १ ते ३ जरी कथितरित्या दत्तोबा हरी महाजन यांच्या मुली असल्याचे क्षणापुरते गृहित धरले तरी त्यांना दत्तोबा हरी महाजन यांच्या मिळकतीत कोणताही कायदेशीर हक्क, अधिकार उपस्थित होत नाही. याबाबत त्यांनी त्यांचा भरवसा खालील प्रावाहनावर ठेवला आहे.

***Radhabai Shirke V.s. Keshav Jadhav in Second Appeal No. 593/1987 The Hon'ble Bombay High Court held that,***

*" The decision in the case of **Pranjivandas Tulsidas and Jagmohandas Jamnadas Vs. Devkuvarba wd/o Ramdas Hirchand** is also important ot be noted for coming to the conclusion that during the period prior to 1956 a daughter would not have any inheritance right, if the widow survives on the death of her husband. The relevant observations of the said decision are re-produced :-*

*The widow, then, not having an absolute estate in the immovable property, it remains to determine who are entitled to the absolute interest subject to the estate taken by her. In this case there are daughters. Now, according to all the authorities, the daughters take next after the widow. When then is the nature of the estate they take ? Here, again there are differences of opinion, but dealing with the question according to the three books I have mentioned, it appears to me that the daughhters take an absolute estate. We*

*find quoted in the Mayukha a passage from Manu : " The son of a man is even as himself, and the daughter is equal to the son; how then can any other inherit his property, but a daughter, who is as it were himself." With reference to this point also I consulted the Shastries both here and at Puna, and inquired whether daughters could alienate any, and what, portion of the property inherited from a father who died seperate. The answer was that daughters so obtaining property could alienate it at their will and pleasure, and in this the Shastris of both places agreed, both also referring to the above text in the Mayukha as their authority for that position.* ***On reviewing all accessible authorities, I have come to the conlusion that daughters take the immovable property absolutely from their father after their mother's death."***

सदर अर्जातील कथने, वरील प्रावाहनामधील परिस्थितीचा विचार केला असता असे दिसून येते की, वरील प्रावाहनामधील निष्कर्ष या प्रकरणाला लागू होतात.

१८. याठिकाणी आणखी एक बाब नमूद करणेसारखी आहे की, मयत दत्तोबा हरी महाजन यांचा मृत्यू १९५२ साली झालेला आहे. सन १९५२ पासून आजपर्यंत म्हणजेच जवळ जवळ ६६ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर झालेल्या उशीराबद्दल कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण आलेले नाही.

१९. एकंदरीत वरील पुराव्याच्या गुणग्रहणावरुन हे शाबीत होते की, अर्जदार यांनी मयत दत्तोबा हरी महाजन हे वारस आहेत, हे सबळ, संयुक्तीक, खात्रीशीर पुरावा देवून शाबीत केलेले नाही. त्यामुळे त्यांना यासंदर्भात वारसा प्रमाणपत्र देता येत नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ व २ चे नकारार्थी उत्तर देवून मुद्दा क्र. ३ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येतो.

IRFAN RHEMAN SHAIKH
Digitally signed by IRFAN RHEMAN SHAIKH
Date: 2025.05.02 16:35:17 +0530

**विटा**
**दिनांक – ०२.०५.२०२५**

**(आय.आर.शेख)**
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, विटा.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order/Judgment are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name | : | S.R.Bansode,Stenographer Grade-II |
| Court | : | Civil Court Sr.Dn. Vita |
| Date of Order/Judgment | : | 02.05.2025 |
| Signed by P.O. on | : | 02.05.2025 |
| Uploaded on | : | 02.05.2025 |